# महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेचे नियम

**१) संस्थेने अर्ज सादर करावयाचा कालावधी :-** सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ३५ व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धांसाठी व्यावसायिक नाट्य निर्मात्यांकडून दिनांक २० जानेवारी, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

**२) स्पर्धेसाठीचे प्रवेश शुल्क:-** प्रत्येक नाटकासाठी रु. २,०००/- प्रवेश शुल्क आकारण्यात येईल व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. धनाकर्ष संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई (Director, Cultural Affairs, Mumbai) यांचे नावे देण्यात यावा. अथवा सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या बँक खात्यात जमा करावे.

**३) स्पर्धेसाठी संस्थेच्या नाटकांची संख्या:-** संस्था तिच्या इच्छेनुसार व्यावसायिक नाट्यस्पर्धेसाठी कितीही नाटके पाठवू शकेल. मात्र प्रत्येक नाट्य प्रयोगासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व स्वतंत्र प्रवेशशुल्क भरावे लागेल.

**४) व्यावसायिक नाट्य स्पर्धेसाठी अर्ज करणाऱ्या नाट्यसंस्थांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे:-**

१. स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाचा प्रवेश अर्ज भरतेवेळी त्या नाटकाचे ज्या वर्षासाठी स्पर्धा घेण्यात येत आहे त्या वर्षाच्या १ जानेवारी २०२४ पासून ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत किमान ५ व्यावसायिक नाट्यप्रयोग झाले असणे आवश्यक आहे. (व्यावसायिक नाट्यप्रयोग याचा अर्थ किमान ७०० आसन क्षमतेच्या नाट्यगृहात तिकिट लावून झालेले प्रयोग)

२. (अ) या स्पर्धेत पुनरुज्जीवित नाट्यकृतींनाही भाग घेता येईल. पुनरुज्जीवित नाटक याचा अर्थ कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या पूर्णत: नवीन संचात वेगळया नाट्यनिर्मात्यांनी सादर केलेली नाट्यकृती असा असले. (आ) स्पर्धेत एकदा सादर झालेली नाट्यकृती त्याच निर्मात्याला त्याच कलाकार तंत्रज्ञांच्या संचात पुन्हा सादर करता येणार नाही. (इ) एखाद्या वर्षी सादर झालेली नाट्यकृती त्याच कलाकारांच्या संचात अन्य निर्मात्याला किंवा अन्य कलाकारांच्या संचात त्याच निर्मात्याला स्पर्धेत सादर करता येणार नाही.

**५) इतर अन्य नियम:-**

१. स्पर्धेत ज्यांच्या नावे अर्ज पाठविला असेल त्यास बक्षीस दिले जाईल. मात्र अर्जावर निर्मात्याची सही असणे आवश्यक आहे.

२. स्पर्धा भरविण्यास कमीत कमी १० प्रवेशिका या नियमावलीच्या निकषानुसार स्पर्धेसाठी पात्र ठरणे आवश्यक आहे.

३. स्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे स्वरुप, विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरीत आहे. नाटकाचे लेखक, भाषांतरीत असल्यास मूळ नाटकाची भाषा, निर्देश करुन कळवावी लागेल. नाटय, कथा, कादंबरी वा इतर अन्य वाङ्मय प्रकारावर आधारीत असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल.

४. स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार शासनातर्फे संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राहील. तसेच ज्यांचे अर्ज नाकारण्यात आले त्यांना संचालनालय लेखी स्वरुपात ते अमान्य करण्याची कारणे कळवेल.

५. संस्थेने स्वत:च्या खर्चाने त्यांच्या नाटकाचा प्राथमिक फेरीसाठी प्रयोग सादर करावा. प्राथमिक फेरीतील प्रयोगास शासनातर्फे कुठलेही आर्थिक वा अन्य सहाय्य देण्यात येणार नाही. संस्थेमार्फत सादर होणाऱ्या प्राथमिक फेरीतील नाटकाची तारीख सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत परिक्षकांना कळविण्यात येईल व परिक्षक सदर नाटकाचे परिक्षण करण्यासाठी हजर राहतील.

६. अंतिम स्पर्धेसाठी जास्तीत जास्त १० अथवा एकूण प्रवेशिकेच्या ५०% नाटकांची निवड केली जाईल.

७. अंतिम स्पर्धेत निवड झालेल्या संस्थांना मुंबई येथे अंतिम स्पर्धा झाल्यास रु. ६०,०००/- इतकी रक्कम नाटकाच्या सादरीकरणासाठी देण्यात येईल आणि मुंबई बाहेर स्पर्धा झाल्यास रु.१,२०,०००/- इतकी रक्कम नाटकाच्या सादरीकरणासाठी देण्यात येईल.

८. अंतिम फेरीच्या वेळी रु. ५०/- व रु. ३०/- दराची तिकीटे ठेवण्यात येतील व ती रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

९. व्यावसायिक नाटय स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी प्रथम पारितोषिक विजेत्या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येईल व त्यासाठी त्यांना नाटक सादरीकरणासाठी मुंबई येथे पारितोषिक वितरण समारंभ असल्यास रु. ६०,०००/- व मुंबई बाहेर पारितोषिक वितरण समारंभ असल्यास रु.१,२०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात येईल.

१०. संस्थेचे बँक अकाऊंट आणि पॅनकार्ड असणे गरजेचे आहे. त्याची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडावी लागेल.

११. व्यावसायिक नाटयस्पर्धेसाठी अर्ज सादर करणाऱ्या संस्थेच्या खोट्या कागदपत्रांबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास याप्रकरणी न्यायालयापुढे उत्तर देण्यास संबंधित संस्था जबाबदार राहील. याप्रकरणी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय अथवा शासन यांची कोणतीही भूमिका नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरणी याचिकेस उत्तर देण्याची जबाबदारी पूर्णत: संस्थेची राहील.

□□□

# प्रतिज्ञापत्र

**दिनांक :**

**प्रति,**

**संचालक,**
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेतील विहित नमुन्यातील अर्जात सादर केलेली माहिती सत्य व बरोबर आहे. स्पर्धेचे सर्व नियम वाचले असून त्या सर्वांचे पालन करण्यात येईल. राज्य शासनाच्या मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेचे नियम आम्हाला बंधनकारक आहेत. कुठल्याही अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. शासनाने या स्पर्धेसाठी नियुक्त केलेल्या परिक्षण समितीने माझ्या नाटकाकरीता दिलेल्या गुणांच्या अनुषंगाने शासनाने घेतलेला अंतीम निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील व त्यावर अपील करण्याची मुभा मला राहणार नाही ही बाब मला मान्य आहे.

सदर स्पर्धेत मला पारितोषिक प्राप्त झाल्यावर जर कोणा त्रयस्थ व्यक्तीने कोणताही आक्षेप घेतला तर त्याचे पूर्ण निराकरण मी स्वत:चे जबाबदारीवर व स्वत:च्या खर्चाने करु, शिवाय अशा आक्षेपामुळे शासनास जर काही आर्थिक नुकसान अथवा खर्च करावा / सोसावा लागला तर त्याची तात्काळ परतफेड करण्याचे मी मान्य करीत आहे.

मी दिलेली माहिती पूर्णत: सत्य असून त्यातील काही माहिती असत्य आढल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन. मी दिलेली कोणतीही असत्य माहितीच्या आधारे या स्पर्धेत पारितोषिक प्राप्त केल्यास सदर पारितोषिकाची रक्कम मी शासनास परत करण्याची हमी देतो.

**नाटयनिर्मात्याची स्वाक्षरी :**

**संस्थेचा शिक्का :**

**संस्थेचे नाव :-**

**संस्थेचा पत्ता :-**

**दुरध्वनी क्रमांक :-**

**भ्रमणध्वनी क्रमांक :-**

**स्थळ :-**